# गुलाबी बोंडअळीच्या नियंत्रणासाठी कामगंध सापळ्यांचा वापर

**महेश महाजन**
विषय विशेषज्ञ (पीक संरक्षण)
कृषी विज्ञान केंद्र, पाल
ता. रावेर, जि. जळगाव



महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांपासून कापूस पिकावरील गुलाबी बोंडअळीने (शेंदरी बोंडअळी) थैमान घातले आहे. आर्थिक नुकसानीच्या पातळीवरुन या किडीचा प्रादुर्भाव समजतो. एकात्मिक कीड व्यवस्थापनाच्या दृष्टीने विविध घटकांचा वापर करत असताना गुलाबी बोंडअळीच्या प्रभावी नियंत्रणासाठी कामगंध सापळ्यांचा वापर करणे महत्त्वाचे आहे. जीवसृष्टीमध्ये कीटक स्वजातीयांशी सुसंवाद साधण्यासाठी स्वत:च्या शरीरातून विशिष्ट गंध असलेल्या रसायनांचे मिश्रण बाहेर सोडतात. ही रसायने त्यांच्यामध्ये विशिष्ट प्रतिक्रिया निर्माण करुन संदेशवहनाचे कार्य करतात. यांना फेरोमोन असे म्हणतात. बाजारामध्ये विविध कीटकांचे कृत्रिमरित्या तयार केलेले फेरोमोन्स उपलब्ध आहेत.

मिलन होण्याकरीता कार्यक्षम सहचर शोधण्यासाठी कामगंधाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. यांच्या गंधाने विरुध्दलिंगी कीटक परस्परांकडे मिलनासाठी आकर्षित होतात.

**सापळ्यांचा फायदा** : या सापळ्यांचा वापर करुन किडींचे सर्वेक्षण करता येते व मोठ्या प्रमाणात किडींचे पतंग सापळ्यात पकडून त्यांचा नाश करता येतो. तसेच कीटकांच्या मिलनात अडथळा निर्माण करुन पुनरुत्पत्तीला अटकाव बसतो.

**कामगंध सापळा असा उभारावा** : कापूस पीक ४५ दिवसांचे झाले असता हेक्टरी ५ सापळे सर्वेक्षणासाठी उभारावे. (आर्थिक नुकसानीची पातळी समजण्याकरिता)

* गुलाबी बोंडअळीचा पतंग मोठ्या प्रमाणावर पकडण्यासाठी हेक्टरी २० ते २५ कामगंध सापळे उभारावेत.

* कामगंध (Lures) दर दोन ते तीन (१५ ते २१ दिवस) आठवड्यांनी बदलावे.

* गुलाबी बोंडअळीच्या नियंत्रणासाठी गॉसील्युर (Gossylure) चा वापर करतात.

* कपाशीच्या झाडापेक्षा अर्धा ते एक फूट उंचीवर कामगंध सापळा उभारावा.

* कामगंध सापळ्यात जर कमीत कमी ८ – १० पतंग प्रतिसापळा तीन रात्रीत अडकलेले आढळल्यास (आर्थिक नुकसानीच्या पातळी) शिफारशीनुसार रासायनिक कीडनाशकांचा वापर करावा.

* दोन कामगंध सापळ्यांतील अंतर ५० मी. पर्यंत ठेवावे.

**वापरात येणारे इतर ल्यूर्स**

| पीक | किडीचा प्रकार | ल्यूर |
|---|---|---|
| कापूस | गुलाबी बोंड अळी | गॉसील्यूर |
| | अमेरिकन बोंड अळी | हेलील्युर |
| | ठिपक्यांची बोंडअळी | व्हिटिल्यूर |

### कामगंध सापळ्याची अशी घ्या काळजी

१) सापळा लाकडी काठी किंवा बांबूस घट्ट बांधावा.

२) ल्यूरची हाताळणी करताना कांदा व लसूणचा हाताना वास नसावा. ३) सापळ्यांची प्लॅस्टिक पिशवी खालच्या बाजूने रबर बॅन्ड किंवा दोरीने घट्ट बांधावी. ४) सापळ्यात अडकलेले पतंग प्लॅस्टिकचा खालचा भाग मोकळा करुन रॉकेलमिश्रित पाण्यात टाकावे. ५) जोराची हवा व पावसामुळे सापळ्यांचे नुकसान होऊ शकते याकरिता वेळोवेळी देखभाल करावी. ६) सापळ्यात अडकलेले पतंग वेळीच बाहेर काढून रॉकेलमिश्रित पाण्यात बुडवून नाश करावेत. ७) सापळ्यातील पतंग किंवा किडी तात्काळ दुसऱ्या दिवशी काढाव्यात अन्यथा रानातील कुत्री सापळ्यांची नासधूस करण्याची शक्यता असते. ■